**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
(CIN NO.U40109MH2005SGC1536460)
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,म.रा.वि.पा.कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग,
मार्केटयार्ड जवळ, बापट कॅम्प, कोल्हापूर. ता.—करवीर, जि.कोल्हापूर.
Email:-ee3210@mahatransco.inWebsite:-www.mahatransco.in

महापारेषण/का.अ./अउदा/ संवसु/वि/कोल्हापूर/मासं/ No 00686 दि. 04 MAY 2026

# जाहीर नोटीस

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, कोल्हापूर अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणून सन २०२५—२०२६ करीता वीजतंत्री (Electrician) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या **https://www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, कोल्हापूर च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर **दि. ०५.०५.२०२६ पासून** ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची **अंतिम मुदत दि. २५.०५.२०२६ (२३.५९) पर्यंत राहिल**. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. वीजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

| आस्थापनेचा रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| E04262700196 | वीजतंत्री (Electrician) | एकुण जागा— ३७ |

**आरक्षण:**

| एकूण पदे | अजा १३% | अज ७% | विजा-अ ३% | भज-ब २.५% | भज-क ३.५% | भज-ड २% | विमाप्र २% | इमाव १९% | आर्थिक दुर्बल घटक १०% | सा.शै.मा.प्र. १०% | खुला २८% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३७ | ५ | ३ | १ | १ | १ | १ | ० | ७ | ४ | ४ | १० |

१) **शैक्षणिक अर्हता:—** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) या आस्थापनेचा यापुर्वीचा रजिस्ट्रेशन क्रमांक E05202702164 काही तांत्रिक अडचणीमुळे कायमस्वरूपी बंद केला असून, सदर आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकवर उमेदवारांनी सादर केलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

३) विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहिल.

४) पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले व सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनास बंधनकारक राहणार नाही.

५) कोल्हापूर जिल्हयातील उमेदवारांना प्रथम प्राधान्य देणेत येईल.

६) ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करून माहीती भरावी.

७) एस.एस.सी गुणपत्र/प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्र/प्रमाणपत्र साक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच, आरक्षणाचा लाभ घेणा—या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये जात प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणा संबंधित कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील. अन्यथा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

**पान २ वर...**

८) शिकाऊ उमेदवारांची सही, पालकांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी. मार्क, आयटीआय मार्क ही माहीती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांच्या शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

९) शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका—याकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची शिकाऊ उमेदवारी रद्द करणेत येईल याची, नोंद घ्यावी.

१०) शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्रे सुस्पष्ट स्कॅन करून योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावे. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्रे सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

११) वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागासवर्गीयांसाठी ०५ शिथिलक्षम)

१२) ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना उमेदवाराने सदयस्थितीत कार्यान्वित असणारा Email-ID व भ्रमनध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. Email-ID व भ्रमनध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य नाही झाले तर त्याची पूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

१३) शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळविण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१४) निवड केलेल्या शिकाऊ उमेदवारांनी रूजू होताना जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर यांच्याकडुन वैदयकीय दृष्टया सक्षम असल्याचा दाखला देणे बंधनकारक आहे.

१५) कागदपत्रे तपासणी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणुन हजर होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता मिळणार नाही.

१६) शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये कंपनीकडुन कोणतीही निवासव्यवस्थेची मागणी करता येणार नाही.

**(हरेशकुमार सं.मोरे)**
**कार्यकारी अभियंता**
**अउदा संवसु विभाग, कोल्हापूर**